गोपनीय

**क्रमांक : का.स./बैठक/२५८**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २४ एप्रिल, २०१८

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या २५८व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सही/- २४/४/१८
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. द. म. सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री. ना. वि. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

अपर मुख्य सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५८वी बैठक

**दिनांक :** **११ एप्रिल, २०१८ (बुधवार)**

**वेळ :** **सायं. ६.०० वाजता**

**स्थळ :** **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**सहावा मजला, मंत्रालय,**
**मुंबई – ४०० ०३२**

**उपस्थित सदस्य :**

श्री. सुमीत मल्लिक - अध्यक्ष
मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन

श्री. नितीन करीर - सदस्य
प्रधान सचिव,
नगर विकास विभाग

श्री.यु.पी.एस. मदान - सदस्य
महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**निमंत्रित :**

श्री. प्रविण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या २५७व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या २५७व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मेट्रो मार्ग -२ ब (डी. एन. नगर – मंडाळे) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.६ व पॅकेज क्र.७ अंतर्गत मागविलेल्या ई-निविदांना मंजूरी देण्याबाबत.**

३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग-२ब च्या स्थापत्य कामांसाठीच्या दोन पॅकेजसाठी (सी.ए. ०६ व सी.ए. ०७) फेर निविदा नोव्हेंबर, २०१७ मध्ये मागविण्यात आल्या होत्या व दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी पात्र निविदाकारांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आले होते. निविदा सादर करण्याच्या दिनांकापूर्वी जी.एस.टी. चे दर १८% होते. मात्र निविदा सादर करण्याच्या दिनांकानंतर दिनांक २५ जानेवारी,

२०१८ रोजीच्या अधिसुचनेव्दारे केंद्र शासनाने मेट्रो कामांसाठी जी.एस.टी. चे दर १८% वरुन १२% असे कमी करण्यात आले. या संदर्भात जी.एस.टी. च्या सक्षम प्राधिकरणानी दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, "The reduction comes to approximately 5.08% of the contract price inclusive of GST". त्यानुसार दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २५७व्या बैठकीत कंत्राटदाराने सादर केलेल्या मुळ लघुत्तम देकारास ५.०८% कमी करुन निविदा स्विकारण्यास मान्यता दिली होती.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे दिनांक १ मार्च, २०१८ रोजीचे पत्र मागे घेतलेले आहे व GST प्राधिकरणाने त्या पत्रात असे कळविले होते की, ***"Two of the bidders M/s. Reliance-Astaldi and joint Venture of M/s. Tata Projects made their representation on 20/03/2018. They brought to our notice that they may not be entitled to refund of whole amount of the unutilised Input Tax Credit due to inverted tax structure. The exact quantum of such amount not eligible for refund needs verification of records at your level. It is opinion of department that the clarification issued to you dated 01/03/2018 may not be fully applicable. Hence, the clarification hereby stands withdrawn".***

३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले होते की, ***"As discussed the issue of quantification of benefit of reduced rate of GST on Metro Rail projects cannot be clarified by our department, since we have not been provided with that mandate by the GST Law. The ascertainment of accrued benefits due to reduction of taxes during the period of contract has to be done at your end only.***

***Under GST a contractor (or any registered taxpayer) is entitled to the refund of unutilized Input Tax credit (GST paid on purchases) on account of Inverted Tax structure (rate of tax on inputs being higher than the rate of tax on output). If there are changes in the tax rates, then there will be subsequent changes in the benefits accruing to the contractor, which he is supposed to pass on to the employer even if there is no such provision in the contract. The GST***

***Law also prohibits unjust enrichment by the contractor. This would require periodic verification of records and returns of the contractor, from the perspective of passing of benefits of reduced taxes or enhanced input tax credits.***

***It will be an ongoing and periodic process, till completion of work. Your office will have to conduct the same to ascertain how much the contractor is benefited from reduced rates of taxes and/ or increase in input tax credit, if any, during the period of contract. This scrutiny will have to be done through your in house resources (if possible) or some third party agency with limited scope of work".***

३.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले कि, वस्तू व सेवा करांचे दर ठरविणे ही सतत व नियमित प्रक्रिया असल्यामुळे काम पूर्ण होईपर्यंत वस्तू व सेवा करांचे दर ठरविणे सद्यस्थितीला शक्य होणार नाही. सबब, निविदाकारांना त्यांनी सादर केलेल्या लघुत्तम देकारास वस्तू व सेवा करामध्ये १८% ते १२% घट झाल्यामुळे निविदाकारांना होणारा लाभ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करावा, या अटीस अधीन राहून लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता द्यावी. प्राधिकरणाचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, GST प्राधिकरणाने GST संदर्भात दिलेले स्पष्टीकरण लक्षात घेता, निविदाकारांनी सादर केलेल्या लघुत्तम देकारास मान्यता देणे योग्य होईल.

३.५ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जी.एस.टी. संदर्भात सविस्तर अभ्यास व छाननी करून जी.एस.टी. च्या कमी झालेल्या दरानुसार होणारा लाभ/नुकसान शासनास सुयोग्यरित्या वर्ग करण्यात येत असल्याची खातरजमा करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामध्ये जी.एस.टी. साठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्यात जी.एस.टी. प्राधिकरणाकडील काही अधिकारी प्रतिनियुक्तीने घेऊन किंवा स्वतंत्र तृतीय पक्षीय जी.एस.टी. सल्लागाराची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

**<u>निर्णय :</u>** **<u>सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १३५४ :</u>**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज - ६ साठी मे.एम.बी.झेड व मे. आर.सी.सी. (जे.व्ही.) यांच्या रू. ५२१,२१,२१,१११ रक्कमेच्या मूळ लघुत्तम देकाराची आणि पॅकेज-७ साठी मे. जी.जी.वाय.एच. बी.सी.एल., व मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि. व मे. पी.के. एच. एस. प्र. लि. (जे.व्ही.) यांच्या रु. ३९३,०१,००,००० रक्कमेच्या लघुत्तम देकारास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** जी.एस.टी. संदर्भात सविस्तर अभ्यास व छाननी करून जी.एस.टी. च्या कमी झालेल्या दरानुसार होणारा लाभ/नुकसान शासनास सुयोग्यरित्या वर्ग करण्यात येत असल्याची खातरजमा करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामध्ये जी.एस.टी. साठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्यात जी.एस.टी. प्राधिकरणाकडील काही अधिकारी प्रतिनियुक्तीने घेऊन किंवा स्वतंत्र तृतीय पक्षीय जी.एस.टी. सल्लागाराची नियुक्ती करून ही कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास आणि वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..६/-

**<u>बाब क्र.४ :</u>** **<u>मेट्रो मार्ग -४ (वडाळा – घाटकोपर – मुलुंड – ठाणे – कासारवडवली) या मेट्रो मार्गाच्या उन्नत मार्ग व स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता पॅकेज क्र.८, पॅकेज क्र.९, पॅकेज क्र.१०, पॅकेज क्र.११ व पॅकेज क्र.१२ अंतर्गत मागविलेल्या निविदा स्विकारणेस मान्यता मिळणेबाबत.</u>**

४.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना असे नमूद केले की, मेट्रो मार्ग-४ च्या स्थापत्य कामांसाठीच्या पाच पॅकेजकरिता (सी.ए. ०८ ते सी.ए. १२) फेर निविदा नोव्हेंबर, २०१७ मध्ये ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या व दिनांक १२ फेब्रुवारी २०१८ रोजी पात्र निविदाकारांचे आर्थिक प्रस्ताव उघडण्यात आले होते. निविदा सादर करण्याच्या दिनांकापूर्वी जी.एस.टी. चे दर १८% होते. मात्र निविदा सादर करण्याच्या दिनांकानंतर दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीच्या अधिसूचनेव्दारे केंद्र शासनाने मेट्रो कामांसाठी जी.एस.टी. चे दर १८% वरुन १२% असे कमी करण्यात आले. या संदर्भात जी.एस.टी. च्या सक्षम प्राधिकरणानी दिनांक १ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, "The reduction comes to approximately 5.08% of the contract price inclusive of GST". त्यानुसार दिनांक ३ मार्च, २०१८ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २५७ व्या बैठकीत कंत्राटदाराने सादर केलेल्या मुळ लघुत्तम देकारास ५.०८% कमी करुन निविदा स्विकारण्यास मान्यता दिली होती.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २६ मार्च, २०१८ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे दिनांक १ मार्च, २०१८ रोजीचे पत्र मागे घेतलेले आहे व GST प्राधिकरणाने त्या पत्रात असे कळविले होते की, ***"Two of the bidders M/s. Reliance-Astaldi and joint Venture of M/s. Tata Projects made their representation on 20/03/2018. They brought to our notice that they may not be entitled to refund of whole amount of the unutilised Input Tax Credit due to inverted tax structure. The exact quantum of such amount not eligible for refund needs verification of records at your level. It is opinion of department that the -clarification issued to you dated 01/03/2018 may not be fully applicable. Hence, the clarification hereby stands withdrawn".***

४.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले होते की, ***"As discussed the issue of quantification of benefit of reduced rate of GST on Metro Rail projects cannot be clarified by our department, since we have not been provided with that mandate by the GST Law. The ascertainment of accrued benefits due to reduction of taxes during the period of contract has to be done at your end only.***

***Under GST a contractor (or any registered taxpayer) is entitled to the refund of unutilized Input Tax credit (GST paid on purchases) on account of Inverted Tax structure (rate of tax on inputs being higher than the rate of tax on output). If there are changes in the tax rates, then there will be subsequent changes in the benefits accruing to the contractor, which he is supposed to pass on to the employer even if there is no such provision in the contract. The GST Law also prohibits unjust enrichment by the contractor. This would require periodic verification of records and returns of the contractor, from the perspective of passing of benefits of reduced taxes or enhanced input tax credits.***

***It will be an ongoing and periodic process, till completion of work. Your office will have to conduct the same to ascertain how much the contractor is benefited from reduced rates of taxes and/ or increase in input tax credit, if any, during the period of contract. This scrutiny will have to be done through your in house resources (if possible) or some third party agency with limited scope of work".***

४.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, GST प्राधिकरणाने दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले कि, वस्तू व सेवा करांचे दर ठरविणे ही सतत व नियमित प्रक्रिया असल्यामुळे काम पूर्ण होईपर्यंत वस्तू व सेवा करांचे दर ठरविणे सद्यस्थितीला शक्य होणार नाही. सबब, निविदाकारांना त्यांनी सादर केलेल्या लघुत्तम देकारास वस्तू व सेवा करामध्ये १८% ते १२% घट झाल्यामुळे निविदाकारांना होणारा लाभ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे वर्ग करावा, या अटीस अधीन राहून लघुत्तम निविदा स्विकारण्यास मान्यता द्यावी. कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, GST प्राधिकरणाने GST संदर्भात दिलेले स्पष्टीकरण लक्षात घेता, निविदाकारांनी सादर केलेल्या लघुत्तम देकारास मान्यता देणे योग्य होईल.

४.५ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, जी.एस.टी. संदर्भात सविस्तर अभ्यास व छाननी करून जी.एस.टी. च्या कमी झालेल्या दरानुसार होणारा लाभ/नुकसान शासनास सुयोग्यरित्या वर्ग करण्यात येत असल्याची खातरजमा करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामध्ये जी.एस.टी. साठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्यात जी.एस.टी. प्राधिकरणाकडील काही अधिकारी प्रतिनियुक्तीने घेऊन किंवा स्वतंत्र तृतीय पक्षीय जी.एस.टी. सल्लागाराची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १३५५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून कार्यकारी समिती याद्वारे पॅकेज-८ साठी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रू.५४०.०० कोटी रक्कमेच्या लघुत्तम देकाराची, पॅकेज-९ साठी मे. चायना हार्बर इजिंनिअरींग कंपनी - टाटा प्रोजेक्टस लि. लाईन ४ (जे.व्ही.) यांच्या रू. ५,३८,०२,९६,९४३ रक्कमेच्या लघुत्तम देकाराची, पॅकेज-१० साठी मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रू.५१३.०० कोटी रक्कमेच्या लघुत्तम देकाराची, पॅकेज-११ साठी मे. चायना हार्बर इजिंनिअरींग कंपनी - टाटा प्रोजेक्टस लि. लाईन ४ (जे.व्ही.) यांच्या रु. ५,१०,२२,३१,६१५ रक्कमेच्या लघुत्तम देकाराची आणि पॅकेज-१२ साठी मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-अस्टालडी (जे.व्ही) यांच्या रु.५३१.०० कोटी रक्कमेच्या लघुत्तम देकारास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वस्तू व सेवा कराच्या किंवा इतर करांच्या दरामध्ये निविदा प्राप्त होण्याच्या दिनांकापासून आतापर्यंत झालेले बदल व कंत्राटीय कालावधीत आणखी बदल झाल्यास कंत्राटीय तरतूदीनुसार कंत्राटीय किंमतीमध्ये वेळोवेळी योग्य ते समायोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

..९/-

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की**, जी.एस.टी. संदर्भात सविस्तर अभ्यास व छाननी करून जी.एस.टी. च्या कमी झालेल्या दरानुसार होणारा लाभ/नुकसान शासनास सुयोग्यरित्या वर्ग करण्यात येत असल्याची खातरजमा करण्यासाठी मुं.म.प्र.वि. प्राधिकरणामध्ये जी.एस.टी. साठी स्वतंत्र कक्ष स्थापन करून त्यात जी.एस.टी. प्राधिकरणाकडील काही अधिकारी प्रतिनियुक्तीने घेऊन किंवा स्वतंत्र तृतीय पक्षीय जी.एस.टी. सल्लागाराची नियुक्ती करून ही कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास आणि वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

५.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.६ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते ३१ मार्च, २०१८**

६.१ दिनांक ०१ जानेवारी, २०१८ ते ३१ मार्च, २०१८ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय :-</u>**

महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीच्या असे निदर्शनास आणले की, कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य श्री. द. म. सुकथनकर यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून सदर राजीनामा मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी स्विकृत करुन शासनाच्या नगर विकास विभागाकडे दिनांक ०३.०३.२०१८ रोजी पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. या संदर्भात कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी श्री. द. म. सुकथनकर यांचा राजीनामा स्विकारुन त्यांच्या जागी नविन सदस्याची नियुक्ती करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********